**CNRNOMHOS120003402023**

**ब्रम्हदेव वि. भागवत व इतर**

विशेष दिवाणी दावा क्र. ११३/२०२३

**निशाणी क्र. १८ खालील आदेश.**

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी तर्फे निशाणी क्र. १० येथे दिलेल्या स्थगीती अर्जास जादा म्हणणे दाखल करण्यासाठी परवानगी मिळण्याकरीता दिलेला आहे. अर्जातील कथनाप्रमाणे यापुर्वी वादीने निशाणी क्र. १० येथे अर्जास त्याचे म्हणणे जरी दिलेले असले तरीही त्या म्हणण्यामध्ये काही मुद्दे कथन करायचे राहुन गेलेले आहेत. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

२. प्रतिवादीने प्रस्तुतच्या अर्जाला म्हणणे दाखल नाही परंतु प्रतिवादीने वादीने दाखल केलेल्या जादा म्हणण्यावरती त्याचे म्हणणे निशाणी क्र. २० येथे दाखल केले आहे.

३. अभिलेखाचे अवलोकन करता हे स्पष्ट होते की, प्रतिवादीने निशाणी क्र. १० येथे प्रस्तुतचा दावा हा फौजदारी केसेसचा निकाल होईपर्यंत स्थगीत करण्यात यावा असा अर्ज दाखल केला आहे. त्या अर्जाला वादीने निशाणी क्र.१२ येथे म्हणणे दाखल केलेले आहे. आता पुन्हा वादीला निशाणी क्र. १० च्या अर्जाला अतिरिक्त म्हणणे दाखल करायचे आहे. माझ्या मते निशाणी क्र. १० येथील अर्जाचा निकाल संपुर्ण गुणदोषांवर होण्यासाठी वादीला अतिरिक्त म्हणणे दाखल करण्याची परवानगी देणे न्यायोचित ठरते. सबब, खालील आदेश.

**<u>आदेश</u>**

१. निशाणी क्र. १८ खालील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तुत अर्जाचा खर्च वादीने सोसण्याचा आहे.

स्वा/-२६.०९.२०२४

दिनांक – २६.०९.२०२४

(ए.पी.कुलकर्णी),
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
भूम.

<u>**CERTIFICATE**</u>

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Mr. Sayyad R.M.<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Mr. A. P. Kulkarni<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom,<br>District - Osmanabad. |
| Date | --- | 26/09/2024 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 26/09/2024 |
| Order uploaded on | --- | 26/09/2024 |